**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम आशियातल्या युद्धामुळे देशातल्या नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- येत्या १ एप्रिलपासून 'फास्टॅग' वार्षिक पासचे दर अडीच टक्क्यांनी वाढणार

- पालघरमध्ये मालगाडीच्या धडकेत तीन तरुणांचा मृत्यू

- सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत झालेली नजरकैद सरकारकडून रद्द

**आणि**

- मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी उद्या मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा, मुंबई महानगर क्षेत्रात उष्णतेची लाट येणार

**<><><><><>**

पश्चिम आशियाई देशातल्या युद्धामुळे देशातील नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असल्याचं  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विरोधी पक्ष मात्र बेजबाबदारीनं वागून देशात गोंधळाचं वातावरण पसरवत असल्याची टीका त्यांनी केली. ते आज आसाममध्ये सिलचर जिल्ह्यातल्या साडेतेवीस हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या विविध विकास कामांची दूरस्थ पद्धतीने पायाभरणी केल्यावर बोलत होते. यामध्ये सिलचरमधील उड्डाणपूल, पाथरकंडी कृषी महाविद्यालयाचा समावेश आहे. आसामच्या युवकांना स्टार्ट अप्ससाठी सहाय्य आणि प्रोत्साहन द्यायला केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा पहिला हप्ता आपण काल आसाममध्ये वितरित केला असं मोदी यांनी सांगितलं. रालोआ सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री मोदी यांनी केला. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ आणि शेतीचं आधुनिकीकरण यांना सर्वोच्च प्राधान्य दिलं जात असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. चहा उत्पादक शेतकऱ्यांनाही जमिनीशी संबंधित सर्व अधिकार प्रदान करणार

असल्याचं ते म्हणाले. ऑईल इंडिया लिमिटेडच्या क्षमता वृद्धी प्रकल्पाचंही प्रधानमंत्र्यांनी यावेळी राष्ट्रार्पण केलं.

प्रधानमंत्री आज कोलकाता इथंही १८ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन करत आहेत. या प्रकल्पांमध्ये रस्त्यांच्या पायाभूत सुविधांना बळ देण्यावर भर दिला असून, त्या अंतर्गत महामार्गांचा समावेश असलेल्या ४२० किलोमीटर लांबीच्या रस्ते प्रकल्पांची पायाभरणी मोदी यांच्या हस्ते होत आहे. तसंच विविध जहाज वाहतूक, बंदरे, रेल्वे आदींशी निगडीत प्रकल्पांचाही यामध्ये समावेश आहे.

<><><><><>

आखाती देशातल्या युद्धामुळं महाग होत असलेल्या विमान इंधनाचा भार प्रवाशांवर टाकण्याचा निर्णय देशातल्या विमान कंपन्यांनी घेतलेला आहे. इंडिगो कंपनीनं आजपासून ही आकारणी सुरू केली आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवास करताना विमान प्रवाशांना सव्वा चारशे ते तेवीसशे रुपये अतिरीक्त मोजावे लागतील. अकासा एअरच्या प्रवाशांना उद्यापासून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवास करताना दोनशे ते तेराशे रुपये अतिरीक्त द्यावे लागतील. एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेसनं १० तारखेपासून इंधन अधिभार वसूल करणे सुरू केलं आहे.

<><><><><>

गॅस सिलेंडरच्या तुटवड्याच्या काळात घरगुती सिलेंडरचा वापर होत असल्याच्या संशयावरुन आज भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे हॉटेल आणि खानावळींवर धाडी टाकण्यात आल्या. एकूण तीन ठिकाणी झालेल्या कारवाईत ८ सिलेंडर जप्त करण्यात आली.

देशातल्या गॅस सिलेंडरच्या तुटवड्याच्या निषेधार्थ भंडारा जिल्हा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निर्दशनं केलं. बीड शहरातील शिवनेरी नगर परिसरात एका घरात घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरचा अवैध साठा केल्याप्रकरणी एकावर गुन्हा नोंदवण्यात आला असून हा साठा जप्त करण्यात आला आहे.

<><><><><>

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने येत्या १ एप्रिलपासून 'फास्टॅग' वार्षिक पासचे दर अडीच टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे तीन हजार रुपयांत मिळणारा हा वार्षिक पास आता ३ हजार ७५ रूपयांना मिळणार आहे.

**<><><><><>**

पालघर शहरात जुना पालघर परिसरात जैन मंदिराजवळ मालगाडीच्या धडकेत काल रात्री तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. घटनेपूर्वी काही पोलीस कर्मचाऱ्यांनी त्या तरुणांना मारहाण केली होती, असा आरोप मृतांच्या कुटुंबीयांनी केला आहे. पोलिसांच्या भीतीमुळे ते तरुण पळू लागले. जवळच असलेल्या रेल्वे ट्रॅकवर ते गेले आणि त्याच वेळी मालगाडीची त्यांना धडक बसली, असंही त्यांनी म्हटलं आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत.  या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यात पिंपरी चिंचवड इथे विटांचं बांधकाम कोसळून पती पत्नी मृत्युमुखी पडले असून  इतर चार कामगार जखमी झाले. जमिनीखालच्या टँकचं बांधकाम सुरु असताना अचानक वरच्या विटा कोसळून कामगार त्याखाली दबले गेले. या प्रकरणी संबंधित ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत झालेली नजरकैद सरकारने तात्काळ प्रभावाने रद्द केली आहे. लेहमध्ये निर्माण झालेल्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या गंभीर प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर लेह दंडाधिकाऱ्यांनी वांगचूक यांना ताब्यात घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये त्यांना ताब्यात घेण्यात आलं होतं. लडाखमध्ये शांतता, स्थिरता आणि परस्पर विश्वासाचं वातावरण निर्माण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असून या उद्दिष्टपूर्तीसाठी नजरकैद रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचं गृह मंत्रालयाने दिलेल्या यासंबंधीच्या निवेदनात म्हटलं आहे. लडाखमध्ये आवश्यक असलेल्या सर्व सुरक्षा उपाययोजना पुरवणार असल्याचा पुनरुच्चारही मंत्रालयाने आपल्या निवेदनात केला.

**<><><><><>**

अकोला जिल्हा पोलीस दलाने विकसित केलेल्या त्रिनेत्र प्रकल्पाची प्रतिष्ठित स्कॉच पुरस्कारासाठी निवड झाली आहे. शासन, सार्वजनिक प्रशासन आणि नागरी नवकल्पना या क्षेत्रातला हा सर्वोच्च स्वतंत्र सन्मान समजला जातो. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी

या प्रकल्पाचं नेतृत्व केलं. हा प्रकल्प एआय-आधारित प्रिव्हेंटिव्ह पोलिसिंग मॉडेल म्हणून देशात लक्षवेधी ठरला आहे.

<><><><><>

नागपुरात कस्तुरचंद पार्कवर साकारलेला भव्य राष्ट्रध्वज जनतेच्या राष्ट्राभिमानाचे प्रतीक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला. नागपूर महानगरपालिका आणि लोकमत वृत्तपत्र समूह यांनी साकारलेल्या २०० फूट उंच भारतीय ध्वजाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण झाले. त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

येत्या तसंच त्यापुढच्या शैक्षणिक वर्षांसाठी मुंबई महापालिकेच्या शाळांमधल्या विद्यार्थ्यांना २७ शालेय वस्तूंचं मोफत वाटप करण्यात येणार असल्याची माहिती स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी दिली आहे. यासाठी जागतिक स्तरावर निविदा मागवल्या असून १६ जूनपर्यंत ३ लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचं वाटप होईल असं ते म्हणाले. शालेय वस्तू खरेदीत असलेली मध्यस्थांची साखळी तोडायची आहे असंही त्यांनी सांगितलं. महानगरपालिकेतली सर्व खरेदी प्रक्रिया पारदर्शक, स्पर्धात्मक आणि नियमबद्ध पद्धतीनं राबवली जावी यासाठी जेम पोर्टलचा अवलंब करणार असल्याची ते म्हणाले.

<><><><><>

एफ.आय.एच. महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठी होणाऱ्या पात्रता फेरीच्या अंतिम सामन्यात आज भारताचा मुकाबला इंग्लंडशी होणार आहे. हैदराबाद इथल्या बालयोगी स्टेडिअमवर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. या स्पर्धेत हे दोन्ही संघ आतापर्यंत विजयी ठरले आहेत. मनीषा चौहाननं केलेल्या गोलच्या साहाय्यानं भारतानं इटलीला १-० असं हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. भारताचा महिला संघ सलग तिसऱ्यांदा विश्वचषकासाठी पात्र ठरला आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसात मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघरमध्ये उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे. याकाळात रत्नागिरी, धुळे, नंदूरबार, जळगाव आणि नाशिकमध्येही वातावरण उष्ण राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

दरम्यान, पुणे, सिंधुदुर्ग, नाशिकचा घाटमाथा इथं हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची तर कोल्हापूर, सातारा, सांगली, बीड आणि परभणीत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**